Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ । वर्ष १ । अंक २०१ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न! (पान २ वर)



Selected

संस्थाचालकांना लगाम; शिक्षक भरती होणार !

मुंबई । राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत संस्थाचालकांच्या मनमानीला लगाम घालण्यासाठी मुलाखतीसह निवड प्रक्रियेत गुणांचे निश्चित निकष ठेवण्यात आले आहेत. यामध्ये शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी मध्ये प्राप्त गुण, शिफारस केलेल्या पदाची व्यावसायिक अर्हता, मुलाखतीसाठी केवळ १० गुण राहणार असल्याने शिक्षक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक होणार अशी माहिती पत्रकार परिषदेत शिक्षण आयुक्त सचिंद्र, प्रताप सिंह यांनी दिलीपवित्र पोर्टलमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ अंतर्गत मुलाखतीसह निवड प्रकारातील नियमित फेरीची सर्वसाधारण गुणवत्तायादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये खासगी व्यवस्थापनांच्या शाळांमधील १० हजार ३२८ रिक्त पदांसाठी ११ हजार ४९३ उमेदवारांची मुलाखत व अध्यापन कौशल्य चाचणीसाठी शिफारस करण्यात आली आहे.

- विजय वडेट्टीवार यांची राज्य सरकारकडे मागणी; ओबीसींचे राजकीय प्रतिनिधित्व धोक्यात येण्याचा इशारा

ओबीसींच्या 200 जागा कमी होण्याची भीती!

जन सम्राट टाईम्स

नागपूर | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास काँग्रेसचा विरोध नाही; मात्र ओबीसी समाजाच्या २७ टक्के राजकीय आरक्षणाला धक्का न लावता आणि त्यांच्या प्रतिनिधित्वाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेऊनच निवडणुका घेण्यात याव्यात, अशी ठाम भूमिका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मांडली.

२७ टक्के आरक्षणाला धक्का न लावता निवडणुका घ्या!

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये यापूर्वी ओबीसी समाजासाठी असलेल्या ५३५ जागांपैकी सुमारे २०० जागा कमी होण्याची शक्यता असल्याचा दावा करत, या जागा वाचवण्याची जबाबदारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची नाही का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नागपुरात शनिवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना वडेट्टीवार यांनी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्य सरकारला धारेवर धरले. २९ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेसंदर्भात आदेश दिल्याचे सांगितले जात असले, तरी हा आदेश सध्या न्यायालयाच्या संकेतस्थळावर दिसत नसल्याचा



मुद्दा त्यांनी उपस्थित केला. न्यायालयाने नेमका कोणता आदेश दिला, ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी सरकारने कोणती बाजू मांडली आणि आरक्षण वाचवण्यासाठी काय प्रयत्न केले, याबाबत सरकारने जनतेसमोर स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन विरोधी पक्षनेते आणि आताचे मुख्यमंत्री ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून तत्कालीन सरकारवर सातत्याने टीका करत होते. ओबीसींचे आरक्षण वाचवण्यात सरकार अपयशी ठरल्याचे आरोप केले जात होते. मात्र, आता सत्तेत असताना ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी विद्यमान सरकारने नेमके काय केले, सर्वोच्च न्यायालयात ओबीसींची बाजू प्रभावीपणे मांडण्यात सरकार कमी का पडले, असे प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केले. ते म्हणाले, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजासाठी पूर्वी ५३५ जागा होत्या. मात्र, आगामी निवडणुकांमध्ये सुमारे २०० जागा कमी होण्याची शक्यता आहे. हा केवळ जागांचा आकडा नसून ओबीसी समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा आणि हक्काचा प्रश्न आहे. त्यामुळे या जागा कमी होऊ नयेत, यासाठी सरकारने गांभीर्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. ओबीसी समाजाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना घ्यावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न राजकीय मतभेद बाजूला ठेवून सोडविण्याची गरज आहे. मुख्यमंत्री यांनी विरोधी पक्षातील नेत्यांना सोबत घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घ्यावी आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा केंद्र सरकारसमोर मांडावा. सरकारने यासाठी पुढाकार घेतल्यास आम्हीही सोबत येण्यास तयार आहोत, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने व्हाव्यात, याबाबत आमचा विरोध नाही.

जातनिहाय जनगणनेत स्वतंत्र कॉलमची मागणी

गेल्या चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने ओबीसी समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व बाधित झाले आहे. या काळात सरकारने घरोघरी जाऊन जातनिहाय जनगणना केली असती, तर ओबीसी समाजाचा आवश्यक इम्पिरिकल डेटा गोळा करता आला असता. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आता आरक्षणाच्या जागा कमी होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे वडेट्टीवार म्हणाले. ओबीसींची खरी लोकसंख्या समोर आणण्यासाठी जातनिहाय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली. अचूक लोकसंख्या समोर आल्यास ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

संजय राऊतांचे नाव ऐकताच बाळासाहेब शिव्या द्यायचे; राज ठाकरेंनी सांगितला जुन्या आठवणींचा किस्सा!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार आणि दैनिक 'सामना'चे संपादक संजय राऊत यांच्या 'बोध कीर्तन' या चित्रपटाच्या प्रकाशन सोहळ्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत झालेल्या या कार्यक्रमाला उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे यांनी संजय राऊत आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यातील सुरुवातीच्या संबंधांबाबत एक जुना किस्सा सांगितला. संजय राऊतांचे नाव ऐकताच बाळासाहेब शिव्या द्यायला सुरुवात करायचे; मात्र पुढे त्यांनीच 'इस बंदे में दम है' असे म्हणत राऊतांचे कौतुक केले होते, अशी आठवण राज ठाकरे यांनी सांगितली. कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे म्हणाले की, संजय राऊत यांना 'लोकप्रभा' साप्ताहिकासाठी बाळासाहेब ठाकरे यांची मुलाखत घ्यायची होती. त्यासाठी संजय राऊत यांनी त्यांच्याकडे मदत मागितली होती. राज ठाकरे यांनी बाळासाहेबांशी याबाबत बोलणी केली. मात्र, सुरुवातीला बाळासाहेब मुलाखत देण्यास तयार नव्हते. संजय राऊतांचे नाव काढताच ते नाराजी व्यक्त करत शिव्या देत असत. राज ठाकरे यांनी दोन-तीन वेळा आग्रह केल्यानंतर अखेर बाळासाहेबांनी मुलाखत देण्यास संमती दिली.

मुलाखतीदरम्यान संजय राऊत यांनी बाळासाहेबांना काही थेट आणि रोखठोक प्रश्न विचारले. या प्रश्नांमुळे बाळासाहेब नाराज झाले आणि त्यांनी राऊतांना पुन्हा शिव्या दिल्या. मात्र, दुसऱ्या दिवशी ही मुलाखत बाळासाहेबांनी दिलेल्या शिव्यांसह प्रसिद्ध झाली. राज ठाकरे यांच्या म्हणण्यानुसार, या प्रसंगानंतर बाळासाहेबांचा संजय राऊत यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन



बदलला. त्यांनी राऊतांचे कौतुक करत 'इस बंदे में दम है' असे म्हटले होते. याच प्रसंगातून संजय राऊत आणि बाळासाहेब यांच्यातील संबंधांना नवे वळण मिळाल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. पुढे संजय राऊत यांची दैनिक 'सामना'च्या संपादकपदी निवड झाली, अशी आठवणही त्यांनी सांगितली. राज ठाकरे यांनी संजय राऊत यांच्याशी असलेल्या जुन्या परिचयाचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, १९८६-८७ च्या सुमारास आपण 'लोकसत्ता'मध्ये फ्रीलान्स कार्टूनिस्ट म्हणून काम करत होतो. त्याच काळात संजय राऊत 'लोकप्रभा'मध्ये कार्यरत होते. राऊत यांनी त्या काळात गॅंगवॉरवर लिहिलेल्या बातम्या आणि लेख विशेष गाजत होते. संजय राऊत आणि चित्रपट समीक्षक दिलीप ठाकूर हे अनेकदा तासन्तास त्यांच्या घरी येत असत. त्यावेळी ते बाळासाहेबांशी विविध विषयांवर गप्पा मारत. त्यामुळे संजय राऊत यांच्याशी आपले संबंध अनेक वर्षांपासूनचे आहेत, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. या सोहळ्यात उद्धव ठाकरे यांनीही आपल्या खास शैलीत संजय राऊत यांच्या पुस्तकावर टिप्पणी केली. 'बोध कीर्तन' या पुस्तकाविषयी बोलताना त्यांनी मिश्कीलपणे, "हे पहिलंच पुस्तक आहे ज्याला अनुक्रमणिका नाही," असे म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे कार्यक्रमात हास्याचे वातावरण निर्माण झाले. एकीकडे संजय राऊत यांच्या चित्रपटाच्या प्रकाशनाचा सोहळा, तर दुसरीकडे बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणी आणि उद्धव-राज ठाकरे यांच्या मिश्कील टिप्पणींमुळे हा कार्यक्रम चर्चेचा विषय ठरला. राज ठाकरे यांनी सांगितलेल्या जुन्या किस्स्यामुळे संजय राऊत यांच्या पत्रकारितेतील सुरुवातीच्या काळातील अनुभव आणि बाळासाहेबांशी निर्माण झालेल्या संबंधांची आठवण पुन्हा चर्चेत आली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार आणि दैनिक 'सामना'चे संपादक संजय राऊत यांच्या 'बोध कीर्तन' या चित्रपटाच्या प्रकाशन सोहळ्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत झालेल्या या कार्यक्रमाला उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे यांनी संजय राऊत आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यातील सुरुवातीच्या संबंधांबाबत एक जुना किस्सा सांगितला. संजय राऊतांचे नाव ऐकताच बाळासाहेब शिव्या द्यायला सुरुवात करायचे; मात्र पुढे त्यांनीच 'इस बंदे में दम है' असे म्हणत राऊतांचे कौतुक केले होते,.

सरदार वल्लभभाई पटेल यांची १५१ वी जयंती साजरी!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीचे औचित्य साधून 'लेवा हितवादी चळवळी'च्या वतीने एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. राज्यावर दुष्काळाचे सावट असताना जयंती केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरती मर्यादित न ठेवता, चळवळीच्या कार्यकर्त्यांनी थेट दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्यासोबत हा दिवस साजरा केला.

संकटकाळात बळीराजाला मानसिक आधार देणे आणि प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. बळीराजाला मदत करणे हीच सरदार पटेलांना खरी आदरांजली! यावेळी बोलताना लेवा हितवादी चळवळीचे मुख्य प्रवर्तक शिशिर जावळे यांनी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योगपती आणि सामाजिक संस्थांना शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले. "बळीराजा हा देशाचा अन्नदाता असून त्याच्या कष्टांवर संपूर्ण अर्थव्यवस्था आधारित आहे. त्यामुळे केवळ सहानुभूती व्यक्त न करता प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे येणे, हीच सरदार पटेलांना खरी आदरांजली ठरेल," असे मत त्यांनी व्यक्त केले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे, खते, पाण्याचे टँकर आणि किराणा साहित्य पुरविण्याबरोबरच



त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याची गरजही जावळे यांनी अधोरेखित केली. पर्यावरण संवर्धनासह शेतकऱ्यांना मदतीचे आवाहन या उपक्रमादरम्यान संत सेवा मंडळाचे प्रकाश जैस्वाल आणि पर्यावरण जागर प्रतिष्ठानचे संचालक सुरेंद्रसिंग पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. पर्यावरण संवर्धन, निसर्गाचा समतोल राखणे आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणे, ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी बांधवांसह मान्यवरांची उपस्थिती या उपक्रमाला परिसरातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. तसेच क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख देवेंद्र वराडे, मुरलीधर लोखंडे, यशवंतदादा पाटील, मिलिंद धांडे, वासुदेव कोळी, बापूदादा महाजन, शंकर भुसे, तुकाराम खाचणे, भागवत पाटील, प्रांजल पाटील, ॲड. सागर सरोदे आणि आर. के. कोळी यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन साजरी झालेली सरदार पटेल यांची जयंती सामाजिक बांधिलकी जपणारी ठरली. केवळ अभिवादन न करता शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये सहभागी होऊन मदतीचा संकल्प करणे, हा सरदार पटेल यांच्या विचारांचा वारसा कृतीत उतरविणारा उपक्रम असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कमी पाण्याच्या पिकांची लागवड करा

मुंबई: जिल्ह्यात पावसातील तूट, जमिनीतील कमी झालेला ओलावा, विहिरी आणि बोरवेलच्या पाणीपातळीत झालेली घट तसेच सिंचनाकरिता प्रकल्पातील पाणीसाठा लक्षात घेता,पीक नियोजन करताना शेतकऱ्यांनी उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या पाळ्यांचा अचूक अंदाज घेऊनच पेरणी व पेरणी क्षेत्र निश्चित करावे. यंदाच्या रब्बी हंगामात प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांना समाधानकारक उत्पादन मिळावे, यासाठी कृषी विभागामार्फत पीक नियोजन, सिंचन व्यवस्थापन, सुधारित पीक पद्धती आणि शासकीय योजनांच्या लाभाबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये विकासकामांचा धडाका

जन सम्राट टाईम्स

सोलापूर | प्रतिनिधी: पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांमधील पायाभूत सुविधा आणि नागरी सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी महापालिकेच्या स्थायी समितीने विविध विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. रस्त्यांचे डांबरीकरण, नाल्यांची दुरुस्ती, पदपथांची उभारणी, पावसाळी पाणी वाहिन्या, सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती, तसेच रुग्णालयांमधील वैद्यकीय यंत्रणांच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामांचा यात समावेश आहे. स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेत या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात ही सभा झाली. चिंचवड येथील तालेरा रुग्णालयातील वातानुकूलन यंत्रणा (एचव्हीएसी), ऑपरेशन थिएटर आणि विद्युत यंत्रणेची पुढील दोन वर्षे देखभाल व दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील (वायसीएम) एक्स-रे विभागातील डिजिटल रेडिओग्राफी मशीनच्या हमी कालावधीनंतर देखभालीसाठी मूळ उत्पादक कंपनीसोबत करार करण्यासही मान्यता देण्यात आली. रस्ते विकासाच्या कामांमध्ये रावेत येथील प्रभाग क्रमांक १६ मधील ताब्यात आलेले डीपी आणि बिगर डीपी रस्ते विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती, प्रभाग क्रमांक २२ मधील पवनानगर व आदर्शनगर परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण, तसेच प्रभाग क्रमांक ६, ८ आणि २० मधील विविध रस्त्यांची दुरुस्ती व डांबरीकरण या कामांचा समावेश आहे. प्रभाग



क्रमांक १९ मधील सुदर्शननगर हेल्थ क्लबजवळील जुने सीडी वर्क पाडून नवीन बांधण्याच्या कामालाही मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक १५ मधील आकुर्डी गावठाण परिसरात पावसाळी पाणी वाहिन्या, पदपथ आणि अन्य स्थापत्यविषयक कामे करण्यात येणार आहेत. प्रभाग क्रमांक ९ मध्ये पदपथांची उभारणी, नेहरूनगर व विठ्ठलनगर परिसरातील स्थापत्यकामे, तर प्रभाग क्रमांक १० मधील शाहूनगर येथे रोड फर्निचरची कामे केली जाणार आहेत. दिघी-बोपखेल, चोविसावाडी, वडमुखवाडी, मोशी, डुडूळगाव आणि प्रभाग क्रमांक १८ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक बसविणे आणि दिशादर्शक फलक लावण्याच्या कामांनाही मान्यता देण्यात आली. याशिवाय, दापोडी, निगडी आणि दिघी येथील पाच मुस्लिम व लिंगायत दफनभूमींच्या देखभालीसाठी संबंधित संस्थांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली. विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत कार्यक्रमांसाठी ध्वनिक्षेपण, सीसीटीव्ही, जनरेटर व प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या निविदाही मंजूर करण्यात आल्या. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनास मुदतवाढ, तसेच प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ मधील वाहन, इंधन आणि चालकासह रिक्षा-टेम्पो व्यवस्थेच्या मुदतवाढीच्या प्रस्तावालाही मान्यता मिळाली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

भाजपची आज ठाण्यात 'लोकतंत्र बचाव पदयात्रा'

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची उपस्थिती; ठाण्यात महायुतीचे शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता

जन सम्राट टाईम्स

ठाणे। प्रतिनिधी: ठाणे: समाजात वाढत चाललेल्या अराजकतेच्या निषेधार्थ ठाणे शहर जिल्हा भाजपच्या वतीने आज, रविवारी सकाळी ९ वाजता 'लोकतंत्र बचाव पदयात्रे'चे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांच्यासह महायुतीचे वरिष्ठ नेते सहभागी होणार आहेत. केंद्रीय तपास यंत्रणा आणि प्रशासनाला विरोधकांकडून लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात येत असून, यानिमित्ताने ठाण्यात महायुतीचे मोठे राजकीय शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता आहे. ठाण्यात गेल्या काही दिवसांपासून शिवसेना (उबाठा) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणानंतर राजकीय आंदोलन, निदर्शने आणि मोर्च्यांमुळे वातावरण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनाच्या नावाखाली समाजात अराजकता आणि भीडतंत्र वाढत असल्याचा आरोप करत भाजपने ही पदयात्रा आयोजित केली आहे. पूर्णेकर हत्या प्रकरणात भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी पूर्णेकर कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन दोषींवर कारवाईची मागणी केली होती. पूर्णेकर यांचे पुत्र राम पूर्णेकर यांनीही गेल्या महिन्यात नवरात्रोत्सवात ठाण्यात आलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली



होती. त्या वेळी फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, 'आम्ही तुमच्या सोबत आहोत; तुम्हाला निश्चित न्याय मिळेल', असे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर तपासाला विशेष गती मिळाली नसल्याचा आरोप राम पूर्णेकर यांनी वारंवार केला आहे. राम पूर्णेकर यांनी शिवसेनेच्या माजी नगरसेविका मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांना अटक करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. पदयात्रेमुळे शहरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन ठाणे वाहतूक शाखेने अधिसूचना जारी केली आहे. पाचपाखाडी येथील ठाणे महापालिकेनजीक परमार्थ निकेतन येथून सकाळी ९ वाजता पदयात्रा सुरू होईल. चंदनवाडी, अलमेडा चौक, दगडी शाळा मार्गे तलावपाळी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासमोर पदयात्रेचे विसर्जन होणार आहे. त्यानंतर वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन होऊन यात्रेची सांगता होईल. या पार्श्वभूमीवर पदयात्रेच्या मार्गावरील वाहतूक रविवारी दुपारी २ वाजेपर्यंत पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. ठाणे: समाजात वाढत चाललेल्या अराजकतेच्या निषेधार्थ ठाणे शहर जिल्हा भाजपच्या वतीने आज, रविवारी सकाळी ९ वाजता 'लोकतंत्र बचाव पदयात्रे'चे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांच्यासह महायुतीचे वरिष्ठ नेते सहभागी होणार आहेत. केंद्रीय तपास यंत्रणा आणि प्रशासनाला विरोधकांकडून लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात येत असून, यानिमित्ताने ठाण्यात महायुतीचे मोठे राजकीय शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता आहे. ठाण्यात गेल्या काही दिवसांपासून शिवसेना (उबाठा) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणानंतर राजकीय आंदोलन, निदर्शने आणि मोर्च्यांमुळे वातावरण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनाच्या नावाखाली समाजात अराजकता आणि भीडतंत्र वाढत असल्याचा आरोप करत भाजपने ही पदयात्रा आयोजित केली आहे. पूर्णेकर हत्या प्रकरणात भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी पूर्णेकर कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन दोषींवर कारवाईची मागणी केली होती.

कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात

बालविवाह प्रतिबंध आणि पॉक्सो कायद्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

भुसावळ प्रतिनिधी : येथील पुंडलिक गणपत बऱ्हाटे माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तालुका विधी सेवा समिती, भुसावळ यांच्या वतीने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांना विविध कायदे, शासकीय कल्याणकारी योजना आणि सामाजिक विषयांबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांगांसाठीच्या योजनांची माहिती तालुका विधी सेवा समितीच्या वतीने ॲड. जास्वंदी भंडारी यांनी मार्गदर्शन करताना दिव्यांग व्यक्ती आणि शासकीय कल्याणकारी योजनांमधील दरी दूर करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची ओळख, योजनांची माहिती, आवश्यक कागदपत्रे आणि लाभ मिळविण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. नागरिकांना विविध कायदेशीर समस्यांवर मोफत कायदेशीर सल्ला, मार्गदर्शन आणि विधी सेवा उपलब्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. व्यावसायिक वाद न्यायालयात खटला दाखल करण्यापूर्वी परस्पर सामंजस्याने सोडविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या पूर्वसंस्थात्मक मध्यस्थी व तडजोड (PIMS) प्रक्रियेचे महत्त्व त्यांनी विशद केले. सायबर फसवणूक आणि बालसुरक्षेबाबत जनजागृती सायबर सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात



आले. याशिवाय 'बालविवाह मुक्त भारत' अभियान, पॉक्सो कायदा २०१२ आणि 'सुरक्षित बालपण' अभियानांतर्गत बालकांचे अधिकार, संरक्षण, बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायद्यातील विविध तरतुदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष तथा माजी मुख्याध्यापक जयंत चौधरी सर होते. प्रमुख पाहुणे म्हणूनही ते उपस्थित होते. व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक पी. जे. चौधरी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी चौधरी, ॲड. जास्वंदी भंडारी तसेच पत्रकार व पीएलव्ही उज्वला बागुल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पीएलव्ही उज्वला बागुल यांनी तालुका विधी सेवा समितीच्या कार्याची, समितीमार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या मोफत विधी सेवांची तसेच सायबर सुरक्षा सप्ताहांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमी माहिती दिली. यावेळी जयंत चौधरी सर आणि मुख्याध्यापक पी. जे. चौधरी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी चौधरी, ॲड. जास्वंदी भंडारी तसेच पत्रकार व पीएलव्ही उज्वला बागुल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पीएलव्ही उज्वला बागुल यांनी तालुका विधी सेवा समितीच्या कार्याची, समितीमार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या मोफत विधी सेवांची तसेच सायबर सुरक्षा सप्ताहांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमी माहिती दिली. यावेळी जयंत चौधरी सर आणि मुख्याध्यापक पी. जे. चौधरी यांनी विधी सेवा समितीच्या जनजागृतीपर उपक्रमांचे कौतुक केले. ॲड. जास्वंदी भंडारी यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना विविध कायद्यांची जाणीव झाली असून, या मार्गदर्शनातील बाबी प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका सौ. चैताली योगेश पाचपांडे यांनी केले. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती जयश्री चौधरी, श्रीमती नीलकमल भोळे, शिक्षक दीपक तायडे, प्रदीप परखड, समीर तडवी, शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती दीपाली सरोदे यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कायदेविषयक जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि विद्यार्थ्यांचे संरक्षण या दृष्टीने हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले. येथील पुंडलिक गणपत बऱ्हाटे माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तालुका विधी सेवा समिती, भुसावळ यांच्या वतीने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांना विविध कायदे, शासकीय कल्याणकारी योजना आणि सामाजिक विषयांबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांगांसाठीच्या योजनांची माहिती तालुका विधी सेवा समितीच्या वतीने ॲड. जास्वंदी भंडारी यांनी मार्गदर्शन करताना दिव्यांग व्यक्ती आणि शासकीय कल्याणकारी योजनांमधील दरी दूर करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

भुसावळमध्ये तालुका विधी सेवा समितीतर्फे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी : येथील पुंडलिक गणपत बऱ्हाटे माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तालुका विधी सेवा समिती, भुसावळ यांच्या वतीने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांसह उपस्थितांना विविध कायदे, शासकीय कल्याणकारी योजना आणि सामाजिक विषयांबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. दिव्यांगांसाठी शासकीय योजनांची माहिती शिबिरात ॲड. जास्वंदी भंडारी यांनी मार्गदर्शन करताना दिव्यांग व्यक्ती आणि शासकीय कल्याणकारी योजनांमधील दरी दूर करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची ओळख, योजनांची माहिती, आवश्यक कागदपत्रे आणि लाभ मिळविण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध कायदेशीर समस्यांवर मोफत कायदेशीर सल्ला, मार्गदर्शन आणि विधी सेवा उपलब्ध असल्याचेही



त्यांनी स्पष्ट केले. व्यावसायिक वाद न्यायालयात खटला दाखल करण्यापूर्वी परस्पर सामंजस्याने मिटविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या पूर्वसंस्थात्मक मध्यस्थी व तडजोड (PIMS) प्रक्रियेचे महत्त्वही त्यांनी विशद केले. सायबर गुन्हे आणि बालसुरक्षेबाबत जनजागृती सायबर सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.
तसेच 'बालविवाह मुक्त भारत' अभियान, पॉक्सो कायदा २०१२ आणि 'सुरक्षित बालपण' अभियानांतर्गत बालकांचे अधिकार, संरक्षण, बालविवाहाचे दुष्परिणाम आणि कायद्यातील विविध तरतुदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष तथा माजी मुख्याध्यापक जयंत चौधरी सर होते. व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक पी. जे. चौधरी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका हेमांगिनी चौधरी, ॲड. जास्वंदी भंडारी तसेच पत्रकार व पीएलव्ही उज्वला बागुल उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या प्रारंभी पीएलव्ही उज्वला बागुल यांनी तालुका विधी सेवा समितीच्या कार्याची, समितीमार्फत नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मोफत विधी सेवांची तसेच सायबर सुरक्षा सप्ताहांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. विधी सेवा समितीच्या उपक्रमांचे कौतुक प्रमुख पाहुणे जयंत चौधरी सर आणि मुख्याध्यापक पी. जे. चौधरी यांनी विधी सेवा समितीच्या जनजागृतीपर उपक्रमांचे कौतुक केले. ॲड. जास्वंदी भंडारी यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना विविध कायद्यांची माहिती मिळाली असून, या मार्गदर्शनाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका चैताली योगेश पाचपांडे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षिका जयश्री चौधरी, नीलकमल भोळे, शिक्षक दीपक तायडे, प्रदीप परखड, समीर तडवी, शिक्षकेतर कर्मचारी दीपाली सरोदे यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कायदेविषयक जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि विद्यार्थ्यांचे संरक्षण या दृष्टीने हे मार्गदर्शन शिबिर उपयुक्त ठरले. येथील पुंडलिक गणपत बऱ्हाटे माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तालुका विधी सेवा समिती, भुसावळ यांच्या वतीने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांसह उपस्थितांना विविध कायदे, शासकीय कल्याणकारी योजना आणि सामाजिक विषयांबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

तहसीलदारांच्या आशीर्वादाने अवैध रेती उपसा सुरू?



जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी : जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात गेल्या सहा महिन्यांपासून अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा गंभीर आरोप आंबेडकर जन मंचने केला आहे. रात्रंदिवस ४०० ते ५०० ट्रक आणि ट्रॅक्टरद्वारे रेतीची वाहतूक होत असून, हा प्रकार अंबडच्या तहसीलदारांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचा खळबळजनक दावा संघटनेने केला आहे. या प्रकरणी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात आली आहे. आंबेडकर जन मंचचे मुख्य संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष विलास म्हस्के, राष्ट्रीय अध्यक्ष महिला आघाडी डॉ. मनीषा घोष आणि मराठवाडा अध्यक्ष महिला आघाडी शितल बाळू जमदाडे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. गोरगरिबांवर गुन्हे, कथित रेती माफियांना अभय? निवेदनात गोरी गंधारी येथील कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. गावातील गोरगरीब रोजंदारी करणाऱ्या तरुणांवर तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्याकडून गुन्हे दाखल करण्यात आले; मात्र प्रत्यक्षात रेती उपशातून लाभ मिळवणाऱ्या कथित वाळू माफियांची नावे कारवाईतून वगळण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच तलाठी गवारे, मंडळ अधिकारी बमणावत आणि पोलीस पाटील निवास विनायक येटाळे (रा. गेवराई) हे गोरी गंधारी गावात वास्तव्यास नसल्याचाही दावा निवेदनात करण्यात आला आहे. बारा गावांमध्ये अवैध उत्खननाचा आरोप अंबड तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवैध रेती उपसा सुरू असल्याचे नमूद करत संघटनेने पुढील गावांची नावे निवेदनात दिली आहेत.

संपादकीय

ओबीसींच्या राजकीय हक्कांवर टांगती तलवार!

२०० जागा कमी होण्याची भीती ही केवळ आकड्यांची बाब नाही; लोकशाहीतील प्रतिनिधित्व, सामाजिक न्याय आणि संविधानिक समतेच्या तत्त्वांशी निगडित गंभीर प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे लोकशाहीचा पाया. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका या संस्था सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या आहेत.

गावातील रस्त्यापासून पिण्याच्या पाण्यापर्यंत, स्वच्छतेपासून शिक्षण आणि आरोग्यापर्यंत अनेक प्रश्नांचा निर्णय या संस्थांच्या माध्यमातून घेतला जातो. त्यामुळे या संस्थांमध्ये समाजातील सर्व घटकांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे ही केवळ राजकीय गरज नाही, तर लोकशाहीची मूलभूत अट आहे. मात्र, आज महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि ओबीसी राजकीय आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजाच्या २७ टक्के राजकीय आरक्षणाला धक्का न लावता निवडणुका घेण्याची मागणी करत, राज्यातील ओबीसींच्या पूर्वीच्या ५३५ जागांपैकी सुमारे २०० जागा कमी होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हा दावा खरा ठरल्यास त्याचे परिणाम केवळ निवडणुकीपुरते मर्यादित राहणार नाहीत; तर राज्यातील सामाजिक आणि राजकीय प्रतिनिधित्वाच्या रचनेवर त्याचा दूरगामी परिणाम होऊ शकतो. ओबीसी आरक्षणाचा विषय चर्चेत आला की अनेकदा तो टक्केवारी, जागांची संख्या आणि न्यायालयीन आदेशांच्या चौकटीत अडकतो. परंतु या आकड्यांच्या पलीकडे एक मोठे सामाजिक वास्तव आहे. अनेक दशकांपासून राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेत पुरेसे प्रतिनिधित्व न मिळालेल्या समाजघटकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्णयप्रक्रियेचा भाग बनविण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. आरक्षणामुळे गावपातळीपासून शहरापर्यंत नेतृत्वाची नवी फळी तयार झाली. सामान्य कुटुंबांतील व्यक्तींना राजकारणात प्रवेश मिळाला. स्थानिक प्रश्न मांडण्याची, प्रशासनाला जाब विचारण्याची आणि विकासाच्या प्रक्रियेत सहभाग घेण्याची संधी निर्माण झाली. त्यामुळे ओबीसी समाजाच्या जागा कमी होण्याची शक्यता ही केवळ निवडणूक निकालातील बदल मानून चालणार नाही. प्रतिनिधित्व कमी झाले, तर स्थानिक निर्णयप्रक्रियेतही या समाजाचा आवाज कमकुवत होण्याची भीती आहे. सामाजिक न्यायाच्या दिशेने झालेली प्रगती मागे जाणार नाही, याची काळजी घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. न्यायालयीन आदेश आणि सरकारची भूमिका पारदर्शक असावी! ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा आणि आवश्यक अनुभवाधारित माहिती या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. विजय वडेट्टीवार यांनी २९ ऑक्टोबरच्या न्यायालयीन आदेशाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. हा आदेश नेमका काय आहे, त्याचे परिणाम काय आहेत आणि ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी राज्य सरकारने न्यायालयात कोणती भूमिका मांडली, याबाबत सरकारने स्पष्ट माहिती द्यायला हवी. न्यायालयीन प्रक्रियेतील प्रत्येक बाब जनतेला समजेल अशा पद्धतीने मांडणे शक्य नसले, तरी सरकारच्या भूमिकेबाबत संदिग्धता राहणे योग्य नाही. न्यायालयात कोणती बाजू मांडली, कोणती कागदपत्रे सादर केली, उपलब्ध माहितीचे स्वरूप काय होते आणि पुढील कायदेशीर पर्याय कोणते आहेत, याची माहिती जनतेसमोर आली पाहिजे. केवळ आरोप-प्रत्यारोप करून हा प्रश्न सुटणार नाही. सरकारने ठोस कृतीतून आपली बांधिलकी सिद्ध केली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दीर्घकाळ रखडणे ही स्वतःमध्ये लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. निवडून आलेले लोकप्रतिनिधी नसताना अनेक ठिकाणी प्रशासकीय यंत्रणेमार्फत कारभार सुरू आहे. नागरिकांच्या प्रश्नांवर थेट उत्तरदायित्व निश्चित करणारी लोकप्रतिनिधींची व्यवस्था कमकुवत झाली आहे. या काळात ओबीसी समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला. वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेला जातनिहाय जनगणनेचा मुद्दा म्हणूनच महत्त्वाचा आहे. निवडणुका रखडल्या असताना आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी सरकारने नियोजनबद्ध प्रयत्न केले असते, तर आजच्या परिस्थितीत काही प्रश्नांची उत्तरे अधिक स्पष्टपणे उपलब्ध झाली असती का, याचा विचार व्हायला हवा.

परभणीच्या जिल्हाधिकारीपदी अण्णासाहेब चव्हाण ! संजयसिंह चव्हाण यांच्याकडून स्वीकारला पदभार

जन सम्राट टाईम्स

परभणी । प्रतिनिधी : परभणी जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदाची सूत्रे अण्णासाहेब चव्हाण यांनी आज, दि. ३१ ऑक्टोबर रोजी स्वीकारली. जिल्हाधिकारी कार्यालयात निवृत्त जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्याकडून त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. संजयसिंह चव्हाण हे नियत वयोमानानुसार आज शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात पदभार हस्तांतरणाची प्रक्रिया पार पडली. त्यानंतर अण्णासाहेब चव्हाण यांनी जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारत जिल्हा प्रशासनाची सूत्रे आपल्या हाती घेतली. विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष नव्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे परभणी जिल्हा प्रशासनात नेतृत्वबदल झाला आहे. आगामी काळात जिल्ह्यातील विकासकामांना गती देणे, प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी करणे आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांचे निराकरण करणे या बाबींवर नव्या जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्या पद्धतीने भर दिला जातो,



याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे. परभणी जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदाची सूत्रे अण्णासाहेब चव्हाण यांनी आज, दि. ३१ ऑक्टोबर रोजी स्वीकारली. जिल्हाधिकारी कार्यालयात निवृत्त जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्याकडून त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. संजयसिंह चव्हाण हे नियत वयोमानानुसार आज शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात पदभार हस्तांतरणाची प्रक्रिया पार पडली. त्यानंतर अण्णासाहेब चव्हाण यांनी जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारत जिल्हा प्रशासनाची सूत्रे आपल्या हाती घेतली. विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष नव्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे परभणी जिल्हा प्रशासनात नेतृत्वबदल झाला आहे. आगामी काळात जिल्ह्यातील विकासकामांना गती देणे, प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण करणे या बाबींवर नव्या जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्या पद्धतीने भर दिला जातो, याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात निवृत्त जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण नियत वयोमानानुसार आज शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात पदभार हस्तांतरणाची प्रक्रिया पार पडली. त्यानंतर अण्णासाहेब चव्हाण यांनी जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारत जिल्हा प्रशासनाची सूत्रे आपल्या हाती घेतली. विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्

विकासकामांच्या अभावामुळे माळेगाव पिंपरीतील ग्रामस्थ आक्रमक!

आठ दिवसांत कामे सुरू न झाल्यास ग्रामपंचायतीला कुलूप ठोकून धरणे आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

माळेगाव पिंपरी। प्रतिनिधी : ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर अंतर्गत येणाऱ्या जनरल व दलित वस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत विकासकामे झाली नसल्याचा आरोप करीत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. रस्ते, गटारी, पाणीपुरवठा आणि युवकांसाठी आवश्यक सुविधांच्या मागण्यांसाठी ग्रामस्थांनी दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. आठ दिवसांत मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून धरणे आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. रस्ते, गटारी आणि पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात जनरल व दलित वस्तीतील मुख्य रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्यात रस्त्यांवर चिखल साचत असल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागतो. सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पक्क्या गटारी व नाल्यांची बांधणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.



जल जीवन मिशनअंतर्गत प्रत्येक घराला स्वतंत्र नळजोडणी देऊन नियमित पाणीपुरवठा करावा, तसेच गावातील प्रत्येक चौकात ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी सिमेंटची बाकडी बसवावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. युवकांसाठी वाचनालय आणि व्यायामशाळेची मागणी गावातील युवकांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी आवश्यक पुस्तकांसह सुसज्ज सार्वजनिक वाचनालय मंजूर करावे. तसेच युवकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ओपन जिम किंवा व्यायामशाळा उभारावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निकृष्ट विकासकामांच्या चौकशीची मागणी ग्रामपंचायत हद्दीत ठेकेदार अविनाश पाटील यांनी केलेली काही विकासकामे मंजूर अंदाजपत्रकानुसार झालेली नसून त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामांची तांत्रिक तपासणी करून चौकशी करावी आणि संबंधित ठेकेदाराला यापुढील कामे देऊ नयेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या आरोपांची प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. आठ दिवसांची मुदत; अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप या निवेदनाची प्रत गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद तसेच सरपंच व ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी यांना देण्यात आली आहे. दिलेल्या मागण्यांवर आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून धरणे आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

ममुराबाद जिल्हा परिषद शाळेत सरदार वल्लभभाई पटेल जयंती

जन सम्राट टाईम्स

ममुराबाद | प्रतिनिधी : ममुराबाद येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त सरदार पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर भाषणे सादर केली, तर गीतांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कपिल सोनवणे, उपाध्यक्ष अल्ताफ



पटेल, केंद्रप्रमुख प्रणिता पाटील, अशोक कोळी, अनंत कुंभार, अरुण संधयान सर, मुख्याध्यापक किशोर सोनवणे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. ममुराबाद येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त सरदार पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

जिल्हा शल्यचिकित्सकांना ॲड. पंकज गोरे यांचा घेराव!

कोट्यवधींच्या खर्चाचा मागितला हिशेब; पारदर्शक चौकशीसाठी राज्यस्तरीय अथवा विभागीय त्रिसदस्यीय समिती नेमण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जिल्हा रुग्णालयातील विविध विकासकामे, वैद्यकीय साहित्य खरेदी, निधीचा विनियोग आणि बांधकामांच्या गुणवत्तेबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना महाराष्ट्र सहसचिव ॲड. पंकज गोरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना जाब विचारत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले.

चौकशी समितीच्या अहवालाचा संदर्भ देत २४ मे २०२२ रोजी मंजूर झालेल्या २३१ कोटी रुपयांच्या निधीपासून ते विविध कोट्यवधींच्या बांधकामांपर्यंतच्या खर्चाचा सविस्तर तपशील सादर करण्याची मागणी त्यांनी केली. संबंधित खर्चाची बिले, व्हाउचर, नोंदवह्या आणि निविदा प्रक्रियेची कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. २३१ कोटींचा निधी नेमका कुठे खर्च झाला? २३१ कोटी रुपयांचा निधी नेमका कुठे, किती आणि कोणत्या कामांसाठी खर्च करण्यात आला, असा थेट सवाल गोरे यांनी उपस्थित केला. या खर्चाशी संबंधित पासिंग बिले, व्हाउचर आणि रेकॉर्ड रजिस्टर दाखवावेत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच १ कोटी ९ लाख रुपयांची संगणक, प्रिंटर व इतर साहित्य खरेदी करण्यात आली. या साहित्याची सद्यस्थिती काय आहे, ते कोणत्या ठिकाणी वापरात आहे आणि मंजूर निधीचा पूर्ण विनियोग झाला आहे का, याची माहितीही त्यांनी मागितली.

निविदा प्रक्रिया आणि ठरावीक संस्थांना कामे देण्यावर प्रश्नचिन्ह कोट्यवधी रुपयांची कामे मोजक्याच तीन ते चार संस्थांना आलटून-पालटून कशी मिळाली? संबंधित संस्थांना कामे देताना कोणती निविदा प्रक्रिया राबविण्यात आली? या संस्थांची संपूर्ण माहिती आणि निविदा प्रक्रियेतील कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी गोरे यांनी केली.



चौकशी समितीच्या अहवालात तांत्रिक बाबींच्या सखोल तपासणीसाठी वरिष्ठ स्तरावरून तांत्रिक अथवा विभागीय चौकशी करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून नेमकी कोणती कार्यवाही करण्यात आली, असा सवालही त्यांनी केला. खरेदीचे निर्णय वरिष्ठ पातळीवरून झाले असतील, तर त्यांची चौकशीही वरिष्ठ स्तरावरूनच व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. ३.६३ कोटींचे अंदाजपत्रक थेट ९.६४ कोटींवर कसे? १०० खाटांच्या स्त्री व बाल रुग्णालयाच्या दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकातील वाढीवर गोरे यांनी प्रश्न उपस्थित केले.

सुरुवातीला ३६३.८१ लाख रुपयांचे असलेले अंदाजपत्रक वाढून ९ कोटी ६४ लाख ६८ हजार ४५५ रुपयांपर्यंत कसे पोहोचले, याचा सविस्तर खुलासा त्यांनी मागितला. या कामासाठी दाखविण्यात आलेल्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे : याशिवाय स्त्री रुग्णालयातील वातानुकूलित यंत्रणेसाठी ३ कोटी ४५ लाख ३६ हजार ९७१ रुपये खर्च करण्यात आल्याचे नमूद करत, एवढा खर्च होऊनही अनेक दिवस वातानुकूलित यंत्रणा बंद का होती, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या खर्चाचा आणि यंत्रणेच्या सद्यस्थितीचा सविस्तर तपशील देण्याची मागणी केली. कार्डियाक कॅथलॅब आणि आयसीयूच्या सुविधांबाबत सवाल १८ कोटी १५ लाख ३७ हजार ५०० रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या कार्डियाक कॅथलॅब युनिटचा प्रत्यक्ष किती रुग्णांना लाभ झाला? सध्या या युनिटमध्ये किती रुग्णांवर उपचार सुरू आहेत?

याची आकडेवारी सादर करावी, अशी मागणी गोरे यांनी केली. आयसीयूसाठी १९ कोटी ६४ लाख ७५ हजार रुपये मंजूर झाल्याचे चौकशी समितीच्या अहवालातून समोर आल्याचा उल्लेख करत, कोट्यवधी रुपये खर्चूनही पहिल्याच पावसात आयसीयू विभागात गळती कशी लागली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या गंभीर बाबीबाबत चौकशी समितीच्या अहवालात समाधानकारक स्पष्टीकरण नसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

संरक्षण भिंतीला तडे; जेसीबीच्या धक्क्याचा पुरावा मागितला

नवीन बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीला सुमारे दहा फुटांचा मोठा तडा गेल्याची बाब उपस्थित करत गोरे यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हा तडा जेसीबीच्या धक्क्यामुळे पडल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आल्याचा उल्लेख करत, त्यासंदर्भातील पुरावा सादर करावा, अशी मागणी त्यांनी केली. त्याच ठिकाणी पुन्हा बारीक तडा कसा गेला? कामाची तांत्रिक तपासणी झाली आहे का? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले. प्रत्यक्ष पाहणीसाठी तारीख आणि वेळ द्या! रुग्णांच्या सोयीसुविधांसाठी खरेदी करण्यात आलेली यंत्रसामग्री, विविध बांधकामे, नूतनीकरणाची कामे आणि इतर सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी ॲड.गोरे यांनी केली. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सकांनी निश्चित तारीख व वेळ कळवावी. त्याच दिवशी प्रत्येक कामावर झालेल्या खर्चाचा सविस्तर लेखाजोखा, बिले, व्हाउचर आणि संबंधित नोंदवह्या उपलब्ध करून द्याव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्याची मागणी या सर्व प्रकरणांची पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सकांनी वरिष्ठ स्तरावर तातडीने पत्रव्यवहार करून आरोग्य आयुक्तांकडे त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्याची मागणी करावी. अन्यथा आपण स्वतः राज्यस्तरावर ही मागणी करू, असा इशाराही ॲड. पंकज गोरे यांनी दिला. यावेळी निलेश चौधरी, पवन सरग, ज्ञानेश्वर देवरे, गोकुळ येलमामे, सिद्धेश गोरे, विक्की गर्ग, अक्षय लाड, पवन खांडरे, योगेश निकम आणि सौरभ जवराल यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जुनी पेन्शन बंदीच्या निषेधार्थ ३१ ऑक्टोबरला 'काळा दिवस'!



जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने ३१ ऑक्टोबर हा दिवस राज्यभर 'काळा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. ३१ ऑक्टोबर २००५ रोजी राज्य शासनाने जुन्या पेन्शन योजनेऐवजी नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याच्या निषेधार्थ दरवर्षी हा दिवस पाळण्यात येतो. संघटनेच्या आवाहनानुसार राज्यातील २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. जुनी पेन्शनसाठी संघर्ष सुरूच याबाबत माहिती देताना संघटनेचे आरोग्य विभागाचे राज्यप्रमुख संजय सोनार कळवाडीकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू व्हावी, यासाठी विविध आंदोलने आणि पाठपुरावा करीत आहे. संघटनेच्या आंदोलनांमुळे शासनाने मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना जुनी पेन्शन लागू केली आहे. तसेच ग्रॅच्युइटी आणि रजा रोखीकरणाचे लाभही मिळाले आहेत. मात्र, सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू होईपर्यंत संघटनेचा संघर्ष संविधानिक मार्गाने अविरत सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. म्हातारपणाचा आधार असलेली जुनी पेन्शन लागू करण्याची मागणी जुनी पेन्शन ही कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या सुरक्षित जीवनाचा आधार आहे. त्यामुळे शासनाने कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करून सर्व पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी संजय सोनार कळवाडीकर यांनी केली. दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपरखेड येथील सर्व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून नियमित कामकाज करत जुनी पेन्शन बंदीच्या निर्णयाचा निषेध नोंदविला. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने ३१ ऑक्टोबर हा दिवस राज्यभर 'काळा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला.

३१ ऑक्टोबर २००५ रोजी राज्य शासनाने जुन्या पेन्शन योजनेऐवजी नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याच्या निषेधार्थ दरवर्षी हा दिवस पाळण्यात येतो. संघटनेच्या आवाहनानुसार राज्यातील २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. जुनी पेन्शनसाठी संघर्ष सुरूच याबाबत माहिती देताना संघटनेचे आरोग्य विभागाचे राज्यप्रमुख संजय सोनार कळवाडीकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू व्हावी, यासाठी विविध आंदोलने आणि पाठपुरावा करीत आहे.

म्युनिसिपल हायस्कूलमध्ये सरदार पटेल जयंती आणि इंदिरा गांधी पुण्यतिथी साजरी!

जन सम्राट टाईम्स



भुसावळ । प्रतिनिधी : भुसावळ नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल येथे भारताचे लोहपुरुष, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त तसेच माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय एकात्मता, देशाची एकता आणि अखंडता जपण्याची सामूहिक शपथ घेतली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच सेवाज्येष्ठ शिक्षिका शालिनी बनसोडे यांच्या हस्ते स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी दोन्ही महान नेत्यांना विनम्र अभिवादन केले. सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या कार्याचा जागर याप्रसंगी डॉ. प्रदीप साखरे, एस. टी. चौधरी आणि मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण आणि राष्ट्रीय एकात्मता व अखंड भारताच्या निर्मितीसाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याची माहिती दिली. तसेच स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना देशाच्या माजी पंतप्रधान म्हणून त्यांनी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय, देशाच्या विकासासाठी केलेले कार्य आणि भारतीय इतिहासातील त्यांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय एकात्मतेची सामूहिक शपथ आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञान न घेता देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये ओळखली पाहिजेत. देशाची एकता, अखंडता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन मार्गदर्शनातून करण्यात आले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय एकात्मता तसेच देशाची एकता व अखंडता जपण्याची सामूहिक शपथ घेतली.

भडगावमध्ये 'सुरक्षित बचपन' अभियानाचा उत्साहात समारोप!

जन सम्राट टाईम्स



भडगाव (प्रतिनिधी): बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण व्हावे, तसेच त्यांना आपल्या वैधानिक हक्कांची जाणीव व्हावी, या उद्देशाने भडगाव तालुका विधी सेवा समिती आणि भडगाव वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'सुरक्षित बचपन अभियान' या कायदेविषयक जनजागृती सप्ताहाचा उत्साहात समारोप झाला. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच मे. दिवाणी व फौजदारी न्यायालय (कनिष्ठ स्तर), भडगाव यांच्या आदेशान्वये २६ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान ही मोहीम राबविण्यात आली. शाळांमध्ये कायदेविषयक मार्गदर्शनाची विशेष सत्रे अभियानांतर्गत शहरातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक अभिजीत दायमा यांच्यासह ॲड. घनश्याम मोरे, ॲड. समाधान सोनवणे, ॲड. हेमंत कुलकर्णी, ॲड. निलेश तिवारी, ॲड. पी. जी. सोनवणे, डॉ. सुवर्णा पाटील, ॲड. आर. के. वाणी, ॲड. गणेश वेलसे, ॲड. ए. डी. बाग, ॲड. रोहित मिसर आणि ॲड. लोकेश म्हसकी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण करणारा पॉक्सो कायदा २०१२, सायबर सुरक्षा, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि बालकामगार प्रतिबंधक कायदे यांची सोप्या भाषेत माहिती देण्यात आली. कोणत्याही प्रकारचा अन्याय किंवा शोषण झाल्यास घाबरून न जाता आवाज उठवावा आणि कायदेशीर मदत घ्यावी, असे आवाहन मान्यवरांनी केले. 'बोलो, बताओ, बचाओ' या संदेशातून विद्यार्थ्यांना निर्भयपणे आपली बाजू मांडण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. सुमनताई गिरधर पाटील विद्यालयात मार्गदर्शन सौ. सुमनताई गिरधर पाटील विद्यालयात आयोजित सत्राच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापिका छाया बिऱ्हाडे होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक तायडे सर, सोनजे सर आणि देवेंद्र पाटील सर यांनी केले. लाडकुबाई विद्या मंदिरातही जनजागृती लाडकुबाई विद्या मंदिरातील सत्राच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका वैशाली पाटील उपस्थित होत्या. यावेळी उपमुख्याध्यापिका सीमा सैंदाणे, आहेर सर आणि सपना देवरे मॅडम उपस्थित होते.

शेतकऱ्यांवर संकट; ७ ते ८ रुपये किलो भावाने उत्पादन खर्चही वसूल होईना!

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील बोरटेक येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी सध्या अस्मानी आणि सुलतानी संकटाचा सामना करीत आहेत. पावसाने मारलेली दडी आणि वाढत्या उष्णतेमुळे टोमॅटो वेळेआधीच पिकून खराब होत आहेत. त्यातच बाजारात व्यापाऱ्यांकडून अवघा ७ ते ८ रुपये प्रतिकिलो भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल करणे कठीण झाले आहे. चार एकर शेतीसाठी लाखोंचा खर्च; उत्पन्नात मोठी घट बोरटेक येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी स्वप्निल सुधाकर जाधव यांनी चार एकर क्षेत्रात टोमॅटो लागवडीसाठी सुमारे अडीच ते तीन लाख रुपये खर्च केले. मात्र प्रतिकूल हवामानामुळे टोमॅटो पिकाचे मोठे नुकसान झाले असून अपेक्षित उत्पन्नातही घट झाली आहे. एकीकडे शेतीसाठी केलेला मोठा खर्च आणि दुसरीकडे बाजारात मिळणारा अत्यल्प दर यामुळे त्यांच्यासह परिसरातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. व्यापाऱ्यांची पाठ; रस्त्यावर टोमॅटो फेकण्याची वेळ लाखो रुपये खर्च करून पिकवलेल्या टोमॅटोला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची निराशा वाढली आहे. व्यापाऱ्यांकडून कमी दर मिळत असल्याने आणि माल विक्रीतून खर्चही निघत नसल्याने हताश शेतकऱ्यांवर टोमॅटो रस्त्यावर फेकून देण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि गुंतवणुकीचे मोल बाजारपेठेत मिळत नसल्याचे या परिस्थितीतून स्पष्ट होत आहे. शेतकऱ्यांची विशेष आर्थिक पॅकेजची मागणी हवामानातील प्रतिकूल बदल आणि बाजारभावातील घसरण या दुहेरी संकटामुळे टोमॅटो उत्पादक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. त्यामुळे राज्य सरकारने बोरटेकसह परिसरातील टोमॅटो उत्पादकांच्या नुकसानीची दखल घेऊन परिस्थितीची पाहणी करावी आणि शेतकऱ्यांना विशेष आर्थिक पॅकेजद्वारे मदत करावी, अशी मागणी होत आहे. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील बोरटेक येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी सध्या अस्मानी आणि सुलतानी संकटाचा सामना करीत आहेत. पावसाने मारलेली दडी आणि वाढत्या उष्णतेमुळे टोमॅटो वेळेआधीच पिकून खराब होत आहेत. त्यातच बाजारात व्यापाऱ्यांकडून अवघा ७ ते ८ रुपये प्रतिकिलो भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल करणे कठीण झाले आहे. चार एकर शेतीसाठी लाखोंचा खर्च; उत्पन्नात मोठी घट बोरटेक येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी स्वप्निल सुधाकर जाधव यांनी चार एकर क्षेत्रात टोमॅटो लागवडीसाठी सुमारे अडीच ते तीन लाख रुपये खर्च केले. मात्र प्रतिकूल हवामानामुळे टोमॅटो पिकाचे मोठे नुकसान झाले असून अपेक्षित उत्पन्नातही घट झाली आहे. एकीकडे शेतीसाठी केलेला मोठा खर्च आणि दुसरीकडे बाजारात मिळणारा अत्यल्प दर यामुळे त्यांच्यासह परिसरातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. व्यापाऱ्यांची पाठ; रस्त्यावर टोमॅटो फेकण्याची वेळ लाखो रुपये खर्च करून पिकवलेल्या टोमॅटोला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची निराशा वाढली आहे. व्यापाऱ्यांकडून कमी दर मिळत असल्याने आणि माल विक्रीतून खर्चही निघत नसल्याने हताश शेतकऱ्यांवर टोमॅटो रस्त्यावर फेकून देण्याची वेळ आली आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भुसावळमध्ये भव्य शोभायात्रा

वारकरी, टाळकरी आणि संत-महंतांचा मोठा सहभाग; सजीव देखाव्यांनी वेधले नागरिकांचे लक्ष

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: भारताचे लोहपुरुष, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भुसावळ शहरात भव्य शोभायात्रेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. एकता, अखंडता आणि भारतीय संस्कृतीचा सुंदर संगम या शोभायात्रेत पाहायला मिळाला. पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठलनामाचा जयघोष आणि आकर्षक सजीव देखाव्यांमुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. अष्टभुजा देवी मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ शहरातील प्रसिद्ध अष्टभुजा देवी मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला. या शोभायात्रेत परिसरातील तीनशेहून अधिक ह.भ.प. टाळकरी, वारकरी, संत-महंत, कीर्तनकार आणि कथावाचक महाराज मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. टाळांचा गजर आणि विठ्ठलनामाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्यास केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बिनविरोध संचालक रजनीताई सावकारे, केतकीताई पाटील, भुसावळ नगरपालिकेच्या प्रभारी नगराध्यक्षा शैलजा नारखेडे यांच्यासह शहरातील आजी-माजी नगरसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैलगाड्या आणि सजीव देखाव्यांनी



जिंकली उपस्थितांची मने

पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या बैलगाड्या आणि मोटार वाहनांवरील आकर्षक सजावट शोभायात्रेचे विशेष आकर्षण ठरली. या वाहनांवर साकारण्यात आलेल्या सजीव देखाव्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. भारताला एकसंध ठेवण्यासाठी ऐतिहासिक योगदान देणाऱ्या लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा सजीव देखावा विशेष लक्षवेधी ठरला. तसेच खान्देशच्या लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा जात्यावर पीठ दळताना आणि कविता गातानाचा देखावाही उपस्थितांना भावला. सरदार पटेल यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन शोभायात्रा जुना सातारा परिसरातील भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल चौकात पोहोचली. तेथे सरदार पटेल यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवर आणि नागरिकांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी त्यांच्या स्मृतींना उजाळा देत देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. सरदार पटेल यांचे कणखर नेतृत्व, राष्ट्रनिष्ठा आणि दूरदृष्टी प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. देशाची एकता आणि अखंडता टिकवण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शोभायात्रेच्या यशस्वी आयोजनामुळे भुसावळमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आयोजकांनी सहभागी वारकरी, नागरिक, मान्यवर आणि लोकप्रतिनिधींचे आभार मानले. भारताचे लोहपुरुष, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भुसावळ शहरात भव्य शोभायात्रेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. एकता, अखंडता आणि भारतीय संस्कृतीचा सुंदर संगम या शोभायात्रेत पाहायला मिळाला. पारंपरिक वेशभूषा, टाळ-जयघोष आणि आकर्षक सजीव देखाव्यांमुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. अष्टभुजा देवी मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ शहरातील प्रसिद्ध अष्टभुजा देवी मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला.

वैभव पवार यांचा भीषण अपघातात मृत्यू

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: भुसावळ नगरपरिषदेचे आस्थापना प्रमुख वैभव पवार यांचे शनिवारी मध्यरात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी निधन झाले. या अपघातात त्यांच्यासोबत प्रवास करणारी त्यांची बहीण गंभीर जखमी झाली असून, त्यांच्यावर गोदावरी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे भुसावळ नगरपरिषद प्रशासनासह संपूर्ण शहरात शोककळा पसरली आहे. शिवपूर-कन्हाळे रोडवर भीषण अपघात मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वैभव पवार हे शनिवारी मध्यरात्री सुमारे दोन वाजता रेल्वे स्थानकाच्या दिशेने जात होते. दरम्यान, शिवपूर-कन्हाळे रोडवरील कुकरेजा सुपरमार्टसमोर त्यांच्या वाहनाचा भीषण अपघात झाला. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने वैभव पवार यांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. बहीण गंभीर जखमी; अतिदक्षता विभागात उपचार अपघाताच्या वेळी वैभव पवार यांच्यासोबत त्यांच्या बहीणही वाहनात प्रवास करत होत्या. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी गोदावरी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. नगरपरिषद प्रशासनात हळहळ वैभव पवार यांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त समजताच भुसावळ नगरपरिषदेतील अधिकारी, कर्मचारी, महसूल विभागातील सहकारी आणि नागरिकांमध्ये शोक व्यक्त करण्यात येत आहे.

भोकर SBI दरोड्याचा मास्टरमाइंड बडतर्फ PSI?

कारागृहातच रचला २७ किलो सोन्याच्या लुटीचा कट!, १६ लॉकर उघडून पाच ते सहा बॅगांत सोने-रोकड भरली





बडतर्फ पीएसआय शंकर रमेश जासक (रा. खेडी, जळगाव)

अंकुश श्रावण चव्हाण (रामदेव वाडी, ता. जळगाव)

गजानन राजेंद्र पवार न्यायडोंगरी, नाशिक)

अंकुश तुळशीराम चव्हाण (खापरखेडा)



जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जळगाव तालुक्यातील भोकर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) शाखेवर पडलेल्या सशस्त्र दरोड्याच्या तपासात धक्कादायक माहिती समोर येत आहे. या दरोड्याचा मुख्य सूत्रधार बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक शंकर जासक असल्याची प्राथमिक माहिती असून, त्याने कारागृहात असतानाच साथीदारांसोबत लुटीचा कट रचल्याचे तपासात निष्पन्न होत असल्याचे सांगितले जात आहे. बँकेतील तब्बल १६ लॉकर उघडून सुमारे २७ किलो सोने आणि रोकड लुटल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, तालुका आणि धरणगाव पोलिसांनी वेगवान हालचाली करत चार संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून सोन्याच्या बॅगा आणि सुमारे १५ लाख रुपयांची रोकड हस्तगत केल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शंकर जासक याने २०२३ मध्ये जळगाव शहरातील शनिपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील स्टेट बँकेत आपल्या शालकाच्या मदतीने ३ कोटी १७ लाख रुपयांचा दरोडा टाकला होता. या गुन्ह्यात तो कारागृहात होता. दोन ते तीन महिन्यांपूर्वी तो जामिनावर बाहेर आला होता. दुसरीकडे, गजानन राजेंद्र पवार हा २०२४ मध्ये चाळीसगावजवळ अनैतिक संबंधातून प्रेयसीच्या पतीच्या खुनाच्या गुन्ह्यात कारागृहात होता. तोही दीड महिन्यापूर्वी जामिनावर बाहेर आला होता. जळगाव मध्यवर्ती कारागृहात असताना शंकर जासक आणि गजानन पवार यांची ओळख झाली. याच ओळखीतून अन्य साथीदारांच्या मदतीने भोकर येथील बँक लुटण्याचा कट आखल्याची माहिती तपासातून समोर येत आहे. ठरल्याप्रमाणे चार आरोपी बँकेत दाखल झाले. छऱ्याच्या पिस्तुलाचा धाक दाखवत त्यांनी बँक व्यवस्थापक आणि कॅशियर यांना धमकावले. दोघांच्या डोक्याला पिस्तूल लावून आरोपींनी बँकेतील तब्बल १६ लॉकर उघडण्यास भाग पाडले. त्यानंतर लॉकरमधील सोने आणि रोकड पाच ते सहा बॅगांमध्ये भरून आरोपींनी पलायन केले. आरोपी जवळपास ४० ते ४५ मिनिटे बँकेत असल्याची माहिती आहे. दरोड्याची माहिती मिळताच भोकर येथील पोलीस पाटलांनी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शशिकांत पाटील यांच्याशी संपर्क साधला. आरोपींचे वर्णन आणि पळून जाण्याची दिशा कळताच पोलिसांनी तातडीने नाकाबंदी सुरू केली. त्यावेळी बीट अंमलदार रिधूर आणि डिक्साई परिसरात तपासकामी होते. स्थानिक नागरिकांच्या मदतीने डिक्साई येथे दोन आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. चौकशीत उर्वरित दोघे वाहनाने धरणगावच्या दिशेने गेल्याची माहिती मिळाली. त्यानुसार शशिकांत पाटील यांनी धरणगाव पोलिसांना सतर्क केले. धरणगाव पोलिसांनीही तातडीने कारवाई करत उर्वरित दोघांना ताब्यात घेतले.दरोड्यानंतर ग्रामस्थांनी आरोपींचा पाठलाग सुरू केला होता. यावेळी आरोपींनी चावलखेड्याजवळ रस्त्याच्या बाजूला चार बॅगा फेकल्याची माहिती आहे. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने परिसरात शोधमोहीम राबवली. याचदरम्यान शंकर जासक आणि गजानन पवार हे दोघे शेतात लपून बसल्याचे आढळले. या कारवाईत तालुका पोलिसांनी दोन, तर धरणगाव पोलिसांनी दोन अशा एकूण चार संशयितांना ताब्यात घेतले.

२७ किलो सोन्याची लूट? मोजदाद सुरू

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून त्यांनी माहिती घेतली. अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, प्रभारी अधिकारी शशिकांत पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्यासह पथक उपस्थित होते. पोलीस अधीक्षकांच्या प्राथमिक माहितीनुसार, बँकेतून जवळपास २७ किलो सोने लुटल्याचा अंदाज आहे. मात्र सोन्याचे नेमके वजन आणि रोकड यांची मोजदाद व पडताळणी सुरू आहे. या प्रकरणात एफआयआर दाखल होण्यापूर्वी प्राथमिक माहिती देण्यात आली असून, अधिकृत प्रेस नोटद्वारे अंतिम तपशील जाहीर केला जाणार आहे. कारागृहातील ओळखीतून आखल्याचा संशय असलेला दरोड्याचा कट, बँकेतील १६ लॉकरची लूट आणि पोलिसांची वेगवान कारवाई यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पोलीस पाटील, बीट अंमलदार, ग्रामस्थ आणि तालुका-धरणगाव पोलिसांच्या समन्वयामुळे चारही संशयितांना ताब्यात घेण्यात यश आले. पुढील तपासातून या दरोड्यामागील संपूर्ण नेटवर्क उघड होण्याची अपेक्षा आहे.

सखोल चौकशी करा: पालकमंत्री

भोकर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेवर पडलेल्या सशस्त्र दरोड्याची पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी गंभीर दखल घेतली आहे. या गुन्ह्याच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करावी, दरोड्यात सहभागी सर्व आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना दिले. घटनेची माहिती मिळताच पालकमंत्र्यांनी पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानंतर भोकर येथील बँकेत जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. बँक व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून दरोड्याची सविस्तर माहिती घेतली. दरोडेखोरांना पकडण्यासाठी धाडस दाखवणाऱ्या विदगाव, भोकर आणि डिकसाई येथील तरुण व ग्रामस्थांचे त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच अल्पावधीत संशयितांना ताब्यात घेण्यासाठी तत्परतेने कारवाई करणारे पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील आणि त्यांच्या पथकाचे अभिनंदन केले. बँक कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखून केलेल्या प्रतिकाराचेही त्यांनी कौतुक केले. दरम्यान, पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासाचा पालकमंत्र्यांनी आढावा घेतला. दरोड्यामागील संपूर्ण कट, सूत्रधार आणि इतर सहभागींचा शोध घेण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनीही परिसरातील अनोळखी व्यक्तींच्या संशयास्पद हालचालींबाबत सतर्क राहून तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील, बँक अधिकारी-कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

जनावरे चोरणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात!



जन सम्राट टाईम्स

नरडाणा प्रतिनिधी : शेतकऱ्यांच्या गोठ्यातून जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचा नरडाणा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. शिंदखेडा तालुक्यातील वारूड येथील शेतकऱ्याच्या शेडमधून चोरीला गेलेल्या बैलजोडीचा गुन्हा उघड करण्यात पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत वाहनासह एकूण ३ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सिंदखेडा तालुक्यातील दोघांसह अमळनेर येथील एक अशा तिघांना अटक करण्यात आली आहे. वारूड येथील शेतकऱ्याची बैलजोडी चोरीला शिंदखेडा तालुक्यातील वारूड येथील शेतकरी मुकेश पाटील यांच्या जनावरांच्या शेडमधून बैलजोडी चोरीला गेली होती. याप्रकरणी नरडाणा पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता बैलजोडी चोरीचा गुन्हा उघडकीस आला. जामनेर येथे बैलजोडी विकल्याची कबुली या प्रकरणात पोलिसांनी पुढील संशयितांना अटक केली आहे. रुपेश भरत पाटील (वय २७) – रा. होळ, ता. शिंदखेडा मनीष रमेश पाटील (वय ४६) – रा. वारूड, ता. शिंदखेडा महेंद्र दादाभाऊ भोई (वय ३८) – रा. अमळनेर आरोपींनी चोरी केलेली बैलजोडी जामनेर येथे विकल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईत वाहनासह ३ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

गरीबनगरमधील ९४ बांधकामांवर हातोडा!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी : वांद्रे पूर्वेकडील गरीबनगर परिसरातील उर्वरित ९४ बांधकामे पाडण्याची कारवाई पश्चिम रेल्वेकडून शुक्रवारी हाती घेण्यात आली. दुपारपर्यंत ही सर्व ९४ बांधकामे हटविण्यात आली. यापूर्वी मे २०२६ मध्ये पश्चिम रेल्वेने मोठी निष्कासन मोहीम राबवली होती. मात्र, पुनर्वसनास पात्र असलेल्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी ही ९४ बांधकामे राखून ठेवली होती. आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या सर्व पात्र कुटुंबांना पर्यायी कायमस्वरूपी घरे उपलब्ध करून दिली असून, त्यांचा ताबाही सोपवला आहे. त्यामुळे उर्वरित बांधकामे हटवून जागा मोकळी करण्यात आल्याने वांद्रे टर्मिनसच्या पूर्वेकडील बाजूस महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.मुंबई उच्च न्यायालयाने २३ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. संबंधित याचिका निकाली काढताना न्यायालयाने पात्र प्रकल्पबाधितांना एका आठवड्यात जागा रिकामी करण्याचे निर्देश दिले होते.त्यानंतर ४८ तासांच्या आत रेल्वे प्रशासनाने संबंधित बांधकामे पाडावीत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. त्यानुसार पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पश्चिम रेल्वेने उर्वरित बांधकामे हटविली.

कास्ट्राइब शिक्षक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी कैलास पवार

जि. प.कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी विनायक बैसाणे

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी : कास्ट्राइब संघटनेच्या आगामी राज्य अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर धरणगाव येथे आयोजित कॉर्नर सभेत संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये कास्ट्राइब शिक्षक संघटनेच्या धरणगाव तालुकाध्यक्षपदी कैलास पवार यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी विनायक बैसाणे, तर महिला कार्यकारिणी सदस्यपदी रत्ना कंखरे यांची निवड करण्यात आली. जिल्हा व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन या सभेत जिल्हा व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी राज्य कार्याध्यक्ष अनिल सुरडकर, शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापू साळुंके, जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण बागुल आणि सल्लागार रमेश सोनवणे यांनी संघटनात्मक कार्य, कर्मचारी व शिक्षकांचे प्रश्न तसेच आगामी अधिवेशनाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. सभेत दगडू सूर्यवंशी, भूपेंद्र बाविस्कर, किशोर म्हस्के आणि महादू अहिरे यांनीही विविध विषयांवर आपले विचार मांडले. संघटनेची ताकद वाढविण्यासाठी पदाधिकारी व सदस्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन कैलास पवार यांची कास्ट्राइब शिक्षक संघटनेच्या धरणगाव तालुकाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल शिक्षक, सहकारी, मित्रपरिवार आणि विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच विनायक बैसाणे आणि रत्ना कंखरे यांनाही त्यांच्या निवडीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी प्रयत्न होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कास्ट्राइब संघटनेच्या आगामी राज्य अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर धरणगाव येथे आयोजित कॉर्नर सभेत संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये कास्ट्राइब शिक्षक संघटनेच्या धरणगाव तालुकाध्यक्षपदी कैलास पवार यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी विनायक बैसाणे, तर महिला कार्यकारिणी सदस्यपदी रत्ना कंखरे यांची निवड करण्यात आली.



साव-या येथे वनविभाग आणि ग्रामस्थांच्या श्रमदानातून १५ मीटर लांबीचा वनराई बंधारा

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी : यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प रा हिल्याने परिसरातील नदी-नाले आटू लागले आहेत. त्यामुळे वन्यप्राणी, पशुपक्षी तसेच स्थानिक गुराढोरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वन्यजीव आणि पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता व्हावी, या उद्देशाने बिलगाव (प्रा.) वनक्षेत्रातील भुषा परिमंडळाच्या नियतक्षेत्र साव-या येथील कक्ष क्रमांक ४४, मौजे साव-यादिगर येथे वनविभाग आणि स्थानिक ग्रामस्थांच्या संयुक्त श्रमदानातून १५ मीटर लांबीचा वनराई बंधारा उभारण्यात आला. श्रमदानातून जलसंधारणाला हातभार वनराई बंधारा उभारण्यासाठी दगड, माती आणि वाळू नाल्यात आणून ग्रामस्थ व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे श्रमदान केले. पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वाहून जाण्याऐवजी नाल्यात अडवून त्याचा उपयोग उन्हाळ्यात व्हावा, हा या



उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. परिसरातील ज्या नाल्यांमध्ये अद्याप पाणी प्रवाहित आहे, अशा ठिकाणी वनराई बंधारे उभारून पाणीसाठा निर्माण करण्याचे काम वनविभागाकडून हाती घेण्यात आले आहे. या उपक्रमामुळे वन्यप्राणी आणि पशुपक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होणार असून, स्थानिक गुराढोरांचीही तहान भागविण्यास हातभार लागणार आहे. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग वनविभागाच्या पुढाकाराला ग्रामस्थांनी श्रमदानातून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात सरपंच दिलीप पावरा, माजी सरपंच राड्या पावरा, माजी पंचायत समिती सदस्य ठाणसिंग पावरा, पोलीस पाटील पोडया पावरा, छगन पावरा, प्रताप पावरा यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम नंदुरबार वनविभागाचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते यांच्या आदेशानुसार, सहाय्यक वनसंरक्षक रोशन बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बिलगाव (प्रा.) वनक्षेत्रपाल लक्ष्मीकांत शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. वनपाल भरतसिंग परदेशी, वनरक्षक दिलवरसिंग पावरा, आकाश पावरा आणि सविता पावरा यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

ग्रामस्थांच्या श्रमदानातून गोरंबा येथे वनराई बंधाऱ्याची निर्मिती!

नाल्यातील पाणी अडवून हजारो लिटर पाणीसाठा, जलसंधारण उपक्रमाचे परिसरातून कौतुक

जन सम्राट टाईम्स

धडगाव। प्रतिनिधी: यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने परिसरात पाणीटंचाईचे सावट निर्माण होण्याची शक्यता आहे. भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून ग्रुप ग्रामपंचायत गोरंबा आणि स्थानिक ग्रामस्थांनी एकत्रित पुढाकार घेत श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. या उपक्रमामुळे नाल्यातून वाहून जाणारे पाणी अडवून हजारो लिटर पाणीसाठा निर्माण झाला असून, ग्रामस्थांच्या लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या जलसंधारण उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

पावसाचे पाणी अडविण्यासाठी पुढाकार

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईची शक्यता व्यक्त होत आहे. उपलब्ध पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून भविष्यात त्याचा उपयोग व्हावा, या उद्देशाने ग्रुप ग्रामपंचायत गोरंबा आणि ग्रामस्थांनी वनराई बंधारा उभारण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दगड, माती आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा वापर करून श्रमदानातून बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली.

भूजलपातळी वाढण्यास होणार मदत

या बंधाऱ्यामुळे नाल्यातील पाणी अडवून साठविणे शक्य झाले आहे. त्यामुळे परिसरातील भूजलपातळी वाढण्यास मदत होण्याची अपेक्षा



आहे. तसेच उन्हाळ्याच्या दिवसांत स्थानिक नागरिक, पशुधन आणि पशुपक्ष्यांना पाण्याचा आधार मिळू शकतो. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना ग्रामस्थांनी एकजुटीने केलेला हा प्रयत्न जलसंधारणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. लोकसहभागातून जलसंधारणाचा संदेश शासनाच्या विविध योजनांबरोबरच ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातूनही जलसंधारणाची कामे प्रभावीपणे करता येतात, हे गोरंबा येथील उपक्रमातून अधोरेखित झाले आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा पावसाचे पाणी वेळीच अडवून त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या एकजुटीतून साकारलेल्या या वनराई बंधाऱ्यामुळे पाणी संवर्धनाला हातभार लागणार आहे. परिसरातील इतर गावांनीही अशा प्रकारचे उपक्रम राबवून जलसंधारणाच्या चळवळीत सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने परिसरात पाणीटंचाईचे सावट निर्माण होण्याची शक्यता आहे. भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून ग्रुप ग्रामपंचायत गोरंबा आणि स्थानिक ग्रामस्थांनी एकत्रित पुढाकार घेत श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. या उपक्रमामुळे नाल्यातून वाहून जाणारे पाणी अडवून हजारो लिटर पाणीसाठा निर्माण झाला असून, ग्रामस्थांच्या लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या जलसंधारण उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. पावसाचे पाणी अडविण्यासाठी पुढाकार यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईची शक्यता व्यक्त होत आहे. उपलब्ध पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून भविष्यात त्याचा उपयोग व्हावा, या उद्देशाने ग्रुप ग्रामपंचायत गोरंबा आणि ग्रामस्थांनी वनराई बंधारा उभारण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दगड, माती आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा वापर करून श्रमदानातून बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. भूजलपातळी वाढण्यास होणार मदत या बंधाऱ्यामुळे नाल्यातील पाणी अडवून साठविणे शक्य झाले आहे.

मूलभूत सुविधांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचा संकल्प

जन सम्राट टाईम्स

बोदवड । प्रतिनिधी: बोदवड नगरपंचायत निवडणुकीचे वातावरण तापू लागले असून, प्रभाग क्रमांक ७ मधून अनिल नारायण देवकर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे प्रभागातील निवडणूक चर्चेला वेग आला असून, प्रचाराच्या माध्यमातून विकासाचे मुद्दे मतदारांसमोर मांडले जात आहेत. प्रभागाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याचा संकल्प देवकर यांनी व्यक्त केला आहे. नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा, शिक्षण व आरोग्य सुविधांचा विकास आणि नागरिकांसाठी आवश्यक सामाजिक सुविधांचा विस्तार या मुद्द्यांवर भर देण्यात येणार असल्याचे त्यांच्या प्रचार फलकावर नमूद करण्यात आले आहे. यासोबतच हरित,



स्वच्छ आणि सुंदर बोदवड शहर घडविण्याचा निर्धारही त्यांच्या प्रचारातून व्यक्त केला जात आहे. प्रभागातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश मतदारांपर्यंत पोहोचविला जात आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक ७ मधील मतदार देवकर यांच्या उमेदवारीला कसा प्रतिसाद देतात आणि निवडणुकीत कोणाच्या बाजूने कौल देतात, याकडे बोदवड शहराचे लक्ष लागले आहे.